ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १९ ऑगस्ट, १९६४ | अंक १६

## विविध माहिती

**व्याज मिळविण्यासाठीं पुन्हां कर्ज**—कोसी योजनेसाठी मध्यवर्ती सरकारनें बिहार सरकारला दिलेल्या कर्जावरील व्याज चुकतें करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें आणखी १·२८ लाख रुपयांचें कर्ज दिलें आहे. नवीन कर्जाची रक्कम रोखीनें देण्यांत येईल आणि ती येणें असलेल्या व्याजापोटीं जमा करून घेण्यांत येईल.

**विजेच्या गाड्यांचे मार्ग**—रेल्वेचे राज्यमंत्री डॉ. रामसुभग सिंग ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतांत विद्युतीकरण झालेला २,८०९ किलोमीटर लांबीचा रेल्वेमार्ग असेल. त्यांत कलकत्ता ते कानपूर येथपर्यंतचा मुख्य मार्गहि असेल. विद्युतीकरण झालेल्या मार्गावरील वहातूक अर्थातच अधिक वेगाची होते.

**शिवाजी विद्यापीठाला देणगी**—सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळानें शिवाजी विद्यापीठास १ लाख रुपयांची देणगी देण्याचें ठरविलें आहे. बँकेच्या ठरावाप्रमाणें देणगीची रक्कम विद्यापीठाला ४ वार्षिक हप्त्यांनीं देण्यांत यावयाची आहे. त्यापैकीं पहिल्या हप्त्याची रक्कम विद्यापीठाच्या उपकुलगुरूंना लवकरच समारंभपूर्वक देण्यांत येणार आहे.

**केळ्यांच्या वहातुकीला सवलत**—जळगांव जिल्ह्यांतून दिल्लीला रेल्वेनें पाठविण्यांत येणाऱ्या केळ्यांच्या वहातुकीच्या दरांत कपात करण्यांत आली आहे. नवीन दराप्रमाणें प्रत्येक वॅगनला आतां ७५ रुपये कमी भाडें पडेल. जळगांव जिल्ह्यांतून दरसाल १० हजार वॅगन्स केळीं दिल्लीला पाठविण्यांत येतात. वाहतुकीच्या दरांत झालेल्या कपातीमुळें केळ्यांच्या बागाइतदारांना दरसाल ८ लाख रुपयांचा फायदा होईल.

**अंदमानांतील वसाहत**—भारत सरकारचें पुनर्वसन खातें अंदमान आणि निकोबार बेटांतील ३ ते ४ हजार एकर अरण्यव्याप्त जमीन लागवडीयोग्य करणार आहे. खात्यातर्फे ह्या बेटाची लवकरच पहाणी करण्यांत येणार आहे. नव्यानें हस्तगत करण्यांत येणाऱ्या जमिनीवर ६०० ते ८०० निराश्रित कुटुंबांची वसाहत उभारण्यांत येईल.

**रुपयाची किंमत फक्त १७ पैसे**—नियोजन समितीचे एक सभासद आणि अलाहाबाद विद्यापीठाच्या व्यापार फॅकल्टीचे प्रमुख डॉ. ए. एन्. अगरवाल ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, गेल्या वीस वर्षांच्या काळांत रुपयाची किंमत ८३ टक्क्यांनीं घसरली आहे. ह्या घसरगुंडीला वायुचक्राप्रमाणें वाढत जाणाऱ्या पदार्थांच्या किमती ह्याच प्रामुख्यानें जबाबदार आहेत. रुपयाची आजची किंमत अवघी १७ पैसे आहे.

**उत्पन्नावर मर्यादा घाला**—तामीळनाड काँग्रेस कमिटीच्या बैठकींत भाषण करतांना मध्यवर्ती सरकारचे पोलाद आणि खाणीमंत्री श्री. संजीव रेड्डी ह्यांनीं अशी सूचना केली कीं, सरकारनें सर्व प्रकारांनीं मिळणाऱ्या उत्पन्नावर कमाल मर्यादा घालावी. जमिनीच्या बाबतींत कमाल धारणेचे कायदे करण्यांत येत आहेत अगर आले आहेत. त्याप्रमाणें कमाल उत्पन्नालाहि मर्यादा घालण्यांत आली पाहिजे. कांहीं थोड्या कुटुंबांनीं अनियंत्रितपणें संपत्तिसंचय चालविला आहे. त्यांच्यावरहि बंधन घालण्यांत आलें पाहिजे. सध्यां देशांतील २०० औद्योगिक 'कुटुंबें' दोनतृतिआंश उद्योगधंद्यांवर ताबा ठेवून आहेत.

**खनिज तेलाचे विपुल साठे**—भारताच्या भूगर्भांतील खनिज तेलाचे साठे शोधून काढण्याच्या कामीं दोघा परकीय तज्ज्ञांनीं उत्साहवर्धक अभिप्राय व्यक्त केले आहेत. ह्यांपैकीं एक तेलतज्ज्ञ रशिअन असून दुसरा अमेरिकन आहे. दोघेहि संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या मार्फत आलेले आहेत. त्यांच्या मतानें भारताच्या भूगर्भांत खजिज तेलाचे विपुल साठे आहेत. गंगेचें खोरें, पश्चिम बंगाल, कॅारोमांडल किनारा व गुजरातची किनारपट्टी ह्या भागांत हे साठे विखुरलेले आहेत. अमेरिकन तज्ज्ञांच्या मतानें कलकत्ता शहर हें एका तेलाच्या बुधल्यावर वसल्यासारखेंच आहे.

**जुनी गिरणी बंद पडली**—औरंगाबाद येथील ७५ वर्षांची औरंगाबाद मिल्स ही कापडाची गिरणी बंद पडली आहे. त्यामुळें ७०० कामगारांवर रोजगाराला मुकण्याचा प्रसंग ओढवला आहे. गिरणीला अलीकडे खूप तोटा येत असे, त्यामुळें ती चालविणें परवडेनासें झालें होतें. त्याशिवाय यंत्रसामग्रीहि जुनी झालेली होती आणि भांडवलाचाहि तुटवडा भासत होता.

**चीनचें पाकिस्तानला कर्ज**—चीननें पाकिस्तानला सहा कोटी डॉलर्सचें दीर्घ मुदतीचें आणि बिनव्याजी कर्ज देऊं केलें आहे. कर्ज यंत्रसामग्री, उपकरणें व कच्चा माल ह्यांच्या स्वरूपांत देण्यांत यावयाचे आहे. पाकिस्ताननें चीनकडून घेतलेलें हें पहिलेंच कर्ज असून त्याची परतफेड ३० ते ४० वर्षांत ताग, कापूस आणि पक्का माल ह्यांच्या रूपानें करावयाची असें ठरलें आहे.

**कोळसाखाणींना मदत**—भारत सरकारनें खाजगी मालकीच्या कोळसाखाणींना आर्थिक मदत द्यावयाची तयारी दाखविली आहे. मदतीचा उपयोग खाणींचा विस्तार करण्यासाठीं अगर त्यांतील यंत्रसामग्री बदलण्याच्या कामीं करतां येईल. ह्या कामासाठीं लागणाऱ्या भांडवलापैकीं जो भाग परदेशीय चलनांत लागणार असेल तो भारत सरकार पुरविणार आहे.

## नैतिक व धार्मिक शिक्षणाचा अर्थशास्त्रज्ञानें केलेला पुरस्कार

अर्थसाधनाचा नीतीशीं व धर्माशीं कांहीं संबंध नाहीं, असें मानणारांना सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. सी. एन. वकील ह्यांनीं उत्कृष्ट उत्तर दिलें आहे. ते म्हणतात, " थोड्या श्रमांत व थोड्या वळांत पैसा गठविण्याचें एक वेढच निर्माण झालें आहे. ह्या वेढापायीं, आपल्या देशांत राष्ट्रीय सरकार आहे आणि त्या सरकारशीं आपले संबंध पूर्ण संवादी असले पाहिजेत, याचा जणूं आपल्याला विसरच पडला आहे. आज काळाबाजार, करबुडवेपणा, अशा स्वरूपाचा कायदेभंग चालू आहे. पण त्यामागचा हेतु मात्र शुद्ध स्वार्थ आहे; महात्मा गांधींनीं स्वराज्य मिळविण्यासाठीं कायदेभंगाची शिकवण दिली होती, त्या वेळीं त्याग हा त्याचा प्राण होता. आपल्या तुंबड्या भरण्याच्या प्रवृत्तिचें निर्मूलन झालें पाहिजे.

" आजच्या तरुण पिढीला धर्म आणि नीति यांचें शिक्षणच मिळत नाहीं. ब्रिटिशांनीं आपल्या स्वार्थसंपादनासाठीं देशांतील धार्मिक बाबतींत तटस्थतेचें धोरण स्वीकारलें होतें. त्यामुळें, जरी ख्रिश्चन शाळांतून धार्मिक शिक्षण देण्यांत येत असलें तरी आपल्या अन्य शाळांमधून व महाविद्यालयांमधून धार्मिक शिक्षणाची कांहींच सोय नव्हती. स्वतंत्र झाल्यानंतर आपण निधर्मी राष्ट्र बनलों आहोंत. राजकारणांत धर्माची लुडबुड नको या तत्त्वाबद्दल कोणीहि काय सहमतच होईल. आपल्या देशांत अनेक धर्म आहेत. तेव्हां धर्म व राजकारण यांची गल्लत होणें घातकच ठरेल. पण या धोरणामुळें शाळा व महाविद्यालयें यांतून धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याबाबत ब्रिटिशांचे कारवांत जी परिस्थिति होती तीच कायम राहिली आहे. आज शाळा व महाविद्यालयें यांची संख्या गणितश्रेणीनें वाढत आहे पण त्यांतून धार्मिक शिक्षण देण्याचा विचार कोणी करीत नाहींत. "

---

## पोलादाच्या कारखान्यांसाठी लागणारीं प्रशिक्षित माणसें

हिंदमध्यें उभारण्यांत आलेल्या व येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यांना ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ह्या उद्योगधंद्याचें शिक्षण घेतलेलीं किती माणसें लागतील हें अजमावण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक कमिटी नेमली होती. कमिटीनें आपल्या अहवालांत पोलाद कारखान्यांच्या उभारणीसाठीं, ते चालविण्यासाठी आणि त्यांची देखरेख करण्यासाठी लागणाऱ्या माणसांबद्दल माहिती दिली आहे. तीवरून असें दिसतें कीं हा उद्योगधंदा चालविण्यासाठी आणि त्यांचा विस्तार करण्यासाठी ६२ हजार तांत्रिक शिक्षण पूर्ण केलेल्या लोकांची गरज आहे. त्यांपैकी ६ हजार लोक एंजिनिअरिंगचे पदवीधर अगर तत्सम शिक्षण घेतलेले लागतील. सुमारें ११ हजार लोक एंजिनिअरिंग डिप्लोमा घेतलेले लागतील आणि ४५ हजार कुशल अगर अर्धकुशल कामगार लागतील. पोलादाच्या धंद्याचा विकास करण्याचें कार्यहि तंत्रकुशल माणसें मिळण्यावर अवलंबून आहे. भिलई, दुर्गापूर आणि रुरकेला येथील कारखान्यांतून ह्या धंद्याचें शिक्षण देणारीं केंद्रें उघडण्यांत आलेलीं आहेत. ह्या केंद्रांतून ५०० एंजिनिअर्स आणि ३ हजार कामगार ह्यांना शिकवून तयार केले जात आहे. परंतु एवढ्यानें भागण्यासारखें नाहीं. हिंदुस्थान स्टील कंपनीनें ह्या बाबतींत एक नवा उपक्रम सुरू केला आहे. एंजिनिअरिंग कॉलेजांतून शिकत असलेल्या तिसऱ्या वर्षातील कांहीं निवडक विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या सुट्टींत शिक्षण देण्याची योजना कंपनीनें आखली आहे. अशा १७९ विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा कंपनीचा विचार आहे. एंजिनिअरिंग पदवीधरांपेक्षासुद्धा त्याच्या खालच्या दर्जाचे कुशल तंत्रज्ञ मिळणें नेहमींच कठीण जातें, असा अनुभव आहे.


प्रगतिपर सेवेचें ३४ वें वर्ष !

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

स्थापना : १९३० ] [ शेड्यूल्ड बँक

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

फोन : ११८ —::— तार : SERVICE

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ८ लक्ष |
| रिझर्व्हज् | रु. ६.४१ लक्ष |
| ठेवी | रु. २.४७ कोटींचे वर |
| खेळतें भांडवल | रु. १.८८ कोटींचे वर |

स्थानिक शाखा

शहापूर ( फोन : ७१८ ) आणि टिळकवाडी

मुख्य कचेरी, रविवार पेठ, बेळगांव, येथें आणि गोकाक व निपाणी शाखांत सेफ डिपॉझिट लॉकर्स उपलब्ध आहेत.

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

म्हैसूर आणि कर्नाटकांतील महत्त्वाच्या केंद्रांत ३३ शाखा

ए. आर. नाईक,
बी. ए., बी. एससी., एलएल. बी.,
१ मॅनेजिंग डायरेक्टर.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः—युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

सेव्हिंग्ज बँक :—३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष—४¼ टक्के, २ वर्षें—४½ टक्के, ३ वर्षें—४¾ टक्के, ४ वर्षें—५ टक्के, ५ वर्षें—५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा—विस्तार

शाखा—१. मुंबई—फोर्ट, २. मुंबई—गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर—मार्केटयार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

दि. ३१—१२—१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी चेअरमन.

# अर्थ

बुधवार, १९ ऑगस्ट, १९६४



संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## अमेरिकेच्या वकिलाचा इशारा

आंध्र विद्यापीठांतील पदवीनंतरचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना उद्देशून भाषण करतांना अमेरिकेचे भारतामधील वकील मि. चेस्टर बौल्स ह्यांनी असा इशारा दिला आहे कीं, भारतानें मार्क्सवादी देशांकडून मदत घेऊं नये. भारतापुढील अन्नधान्याच्या टंचाईचा प्रश्न सोडविण्याचा मार्ग शेतीचें सामुदाइकीकरण हा नव्हे. अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याच्या बाबतींत भारताने जपानच्या शेतीच्या पद्धतीचा अवलंब करणें उपयुक्त ठरेल. १९५२–५३ साली भारतामधील अन्नधान्याचें उत्पादन ५·५ कोटी टनाच्या आसपास होतें. १९६० च्या शेतीच्या हंगामांत उत्पादन ८ कोटी टनांपर्यंत वाढलें. टक्केवारीच्या भाषेंत ही वाढ ४६ टक्के झाली परंतु देशांतील लोकसंख्या दरसाल २·१ टक्यांनीं वाढत आहे. त्यामुळें अन्नधान्याची तूट भरून काढणें शक्य होत नाहीं. त्यांतच १९६० सालानंतर ३ वर्षें भारतांत पाऊसहि अपुरा झाला. भारतामधील लागवडीयोग्य जमिनींत वाढ होण्याची शक्यता नाहीं आणि अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याची मात्र तांतडीची गरज आहे. हें उत्पादन अर्थातच हातीं असलेल्या जमिनीच्या साह्यानेंच करावें लागणार आहे. भारतांत सध्यां गव्हाचा जितका खप होतो त्या पैकी ६० टक्के गव्हाचा पुरवठा अमेरिकेकडून करण्यांत येत आहे. अमेरिकेंत निर्माण करण्यांत येणाऱ्या गव्हापैकीं १५ टक्के गहूं भारताला पुरविण्यांत येत आहे. तथापि, ही मदत भारताला अडचणीच्या काळांतून बाहेर पडण्यासाठींच देण्यांत येत आहे. जपानमधील शेतकऱ्यांनीं शेतीच्या आधुनिक पद्धति अमलांत आणून शेतीचें उत्पादन वाढविण्यांत यश मिळविलें आहे. ती पद्धत अंमलांत आणली गेल्यास भारतहि आपलें शेतीचें उत्पादन चौपटीनें वाढवूं शकेल असा विश्वास बाळगण्यास हरकत नाहीं.

## खतांची गरज भागविण्याचे प्रयत्न

फर्टिलाइझर्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री. बी. सी. मुखर्जी ह्यांनीं अशी माहिती दिली आहे कीं, भारत सरकारनें खतांच्या उत्पादनाचा एक तांतडीचा कार्यक्रम हातीं घेतला आहे. कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली म्हणजे ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारताची खताची ५० टक्के गरज भागवितां येईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खताच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ८ लाख टन ठरविण्यांत आलें होतें. ४ थ्या कार्यक्रमांत ३० लाख टनांचें उद्दिष्ट ठेवलें जाण्याची शक्यता आहे. सध्यां मात्र ६ लाख टन निर्मिति करण्याइतकेंच कारखान्यांचें सामर्थ्य आहे. मुंबईजवळ ट्रॉंबे येथें, आसाममध्यें नामरूप येथें, उत्तर प्रदेशांत गोरखपूर येथें आणि मध्य प्रदेशांत कोर्बा येथें खतांचे कारखाने उभारण्यांत येत असून त्यांची उभारणी कमी–अधिक प्रमाणांत होत आली आहे. त्याशिवाय बिहारमध्यें बरौनी येथें, राजस्थानांत कोटा आणि उदयपूर ह्या ठिकाणीं, उत्तर प्रदेशांत रिहंड येथें आणि पश्चिम बंगालमध्यें हाल्दिआ ह्या ठिकाणीं खतांचे कारखाने काढण्याची शक्यता आहे काय त्याची तपासणी कॉर्पोरेशनमार्फत चालूं आहे. नांगल येथील कारखान्याचा विस्तार करण्याची शक्यताहि अजमावण्यांत येत आहे. दुर्गापूर येथेंहि कारखाना उभारण्याचा विचार चालूं असून त्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें पैशाची मंजुरी दिली आहे. मुंबईजवळील ट्रॉंबे येथील कारखाना ह्या वर्षअखेर पुरा व्हावयाचा होता. परंतु कारखान्याला आवश्यक असणाऱ्या विजेच्या पुरवठ्यासंबंधीं गैरसमज झाल्यामुळें आतां तो चालूं होण्यास तीन चार महिने अधिक लागणार आहेत. कारखान्यासाठीं ३५ हजार किलोवॅट विजेची आवश्यकता आहे. ह्या कारखान्यासाठीं एकूण सुमारें २९ कोटी रुपये खर्च लागणार आहे.

## निजामाला दिलेल्या सवलतीमुळें नुकसानी

भारत सरकार आणि निजाम ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें हैदराबाद शहरांतील निजामाच्या मालमत्तेवर त्याला कॉर्पोरेशनचे कर द्यावे लागत नाहींत. अलीकडे शहरांतील निजामाच्या मालकीच्या मालमत्तेची करपात्रतेच्या दृष्टीनें तपासणी करण्यांत आली असतां असें आढळून आलें कीं इतर मालमत्तेवर घेण्यांत येतात त्याप्रमाणें स्थानिक करांची वसुली करावयाची ठरविल्यास निजामाला दरसाल ४ लाख रुपये कराप्रीत्यर्थ भरावे लागतील. ह्याचा अर्थ असा कीं, एवढ्या उत्पन्नाला हैदराबादचें कॉर्पोरेशन मुकत आहे. कॉर्पोरेशनच्या ज्या सुखसोयींचा फायदा निजामाच्या मालमत्तेला मिळत आहे, त्यासाठीं निजाम दरसाल अवघे ५० हजार रुपये देत आहे. ह्या बाबतींत राज्यसरकारचे मत असें आहे कीं, भारत सरकारनें निजामाला दिलेल्या सवलतीमुळें कॉर्पोरेशनचें जें उत्पन्न बुडत आहे त्याची भरपाई कॉर्पोरेशनला मध्यवर्ती सरकारकडून मागतां येईल. राज्यसरकारच्या सूचनेप्रमाणें हैदराबाद कॉर्पोरेशननें आपली ह्या हक्काबद्दलची लेखी मागणी मध्यवर्ती सरकारकडे करण्याचें ठरविलें आहे. निजामाच्या मालमत्तेप्रमाणेंच हैदराबाद शहरांतील भारत सरकारच्या इमारती व मालमत्ताहि कराच्या कक्षेंतून वगळण्यांत आलेल्या आहेत. कॉर्पोरेशनच्या मतानें ह्या इमारतींवरहि कर बसविण्याचा अधिकार कॉर्पोरेशनला असला पाहिजे. मोठ्या शहरांच्या कॉर्पोरेशन्सना शहरसुधराईची अनेक कामें करावीं लागतात. ह्या कामासाठीं लागणारा पैसा नेहमींच अपुरा पडतो, म्हणून उत्पन्नाचीं नवीं साधनें शोधण्याच्या प्रयत्नांत ह्या संस्था असतात. शहराची सुधारणा व विकास करण्यासाठीं लागणारा पैसा उभारण्यासाठीं खास प्रयत्न होत असतां उत्पन्नाच्या उघड दिसणाऱ्या बाबी कांहीं आगंतुक कारणांनीं गमावण्यास स्थानिक स्वराज्य संस्था तयार होत नाहींत, ह्यांत नवल नाहीं.

## कुटुंबनियोजनासाठी १०१ कोटींची तरतूद

चवथ्या पंचवार्षिक योजनेंत कुटुंबनियोजनासाठीं १०१ कोटी रु. ची तरतूद करण्याची विनंति आरोग्य खात्यानें प्लॅनिंग कमिशनला केली आहे.

## चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील निर्यात

चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत निर्यातीचें उद्दिष्ट किती ठरविण्यांत यावें ह्याची चर्चा करण्यासाठी नियोजन समितीचे प्रतिनिधी आणि भारत सरकारच्या व्यापार खात्याचे प्रतिनिधी ह्यांची बैठकी घेण्यांत आली होती. झालेल्या चर्चेवरून असें दिसून आलें कीं ह्या कार्यक्रमाच्या कालखंडांत एकूण ५ हजार कोटी रुपयांच्या मालाच्या निर्यातीचें उद्दिष्ट ठरविण्यास अडचण पडूं नये. निर्यातीचें उद्दिष्ट ह्याहीपेक्षा अधिक ठरविता आल्यास पहावें असा प्रयत्नहि चालू आहे. त्या दृष्टीनें नियोजन समितीनें व्यापार खात्याला अशी सूचना केली आहे कीं निर्यातीचें उद्दिष्ट ५ हजार कोटी ऐवजीं ५,३०० कोटी ठेवता येईल किंवा काय ह्याविषयीं तपासणी करण्यांत यावी. दरसाल १ हजार कोटींच्या निर्यातीऐवजीं कार्यक्रमाच्या शेवटच्या म्हणजे ५ व्या वर्षी १,३०० कोटींची निर्यात करता आली तर पहावें असा हेतु ठेवण्यांत येत आहे. व्यापार मंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांच्या मतानें १ हजार कोटींचें उद्दिष्ट व्यवहार्य आहे. परंतु परदेशीय चलन मिळविण्याची भारताची गरज तांतडीची आहे. निर्यातीची निकड लक्षांत घेऊन त्याविषयींच्या धोरणांत बदल करण्यास सरकार तयार आहे असें सांगण्यांत आलें आहे. पंचवार्षिक कार्यक्रमांतील नव्या कामासाठीं लागणारें परदेशीय चलन सोडून, झालेलें औद्योगीकरण सुसूत्र चालूं ठेवण्यासाठीहि परदेशीय चलनाची गरज लागते. पदरांत पडलेलें औद्योगीकरण चालूं ठेवण्यासाठी अनेक प्रकारच्या पक्क्या व कच्च्या मालाची आयात करावी लागते. त्यासाठीं करावी लागणारी निर्यात वेगळीच आहे. ह्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी वेगळा गट स्थापन करण्यांत आलेला आहे. गटानें केलेल्या अंदाजाप्रमाणें औद्योगिक उत्पादन चालूं ठेवण्यासाठीहि ५ हजार कोटींपर्यंत निर्यात करावी लागेल.

## आधुनिक पद्धतीच्या भाताच्या गिरण्या

आधुनिक पद्धतीच्या भाताच्या गिरण्या भारतांत काढण्यासाठी ह्या गिरण्यांची यंत्रसामग्री पाहण्याकरता भारत सरकारचें प्रतिनिधिमंडळ इटली व जर्मनी ह्या देशांत गेलें होतें. इटली आणि जर्मनीमधील भातसडीच्या गिरण्या त्यांना प्रगत अशा आढळून आल्या. आतां प्रतिनिधिमंडळ जपानला जाऊन तेथील गिरण्यांची पाहणी करील. त्यानंतर परदेशांतून भाताच्या गिरण्या मागविण्यासंबंधी निर्णय करण्यांत येईल. तीन टन उत्पादनक्षमतेच्या १ हजार आणि १ हजार टन उत्पादनक्षमता असणाऱ्या १ हजार भाताच्या गिरण्या उभारण्याचा सरकारचा कार्यक्रम आहे. तथापि, ह्या सर्वच गिरण्यांची यंत्रसामग्री परदेशांतून आयात करण्यांत येणार आहे असें मात्र नाहीं. एक, दोन आणि तीन टन उत्पादनक्षमता असणाऱ्या प्रत्येकी दोन गिरण्या त्या वापरून अजमावण्यांत येतील आणि त्यानंतर योग्य त्या प्रकारची यंत्रसामग्री बनविण्याचे कारखानेच उभारण्याचा सरकारचा मानस आहे. तीन टन उत्पादनक्षमतेच्या सध्यां चालू असलेल्या भाताच्या गिरण्या २० हजार टन भातापासून सुमारें ११,२०० टन तांदूळ निर्माण करतात. परंतु आधुनिक पद्धतीच्या गिरणींतून त्याच भातापासून आणखी १,६०० टन तांदूळ पदरांत पडेल असें सांगण्यांत येत आहे. जगांतील अन्नधान्याच्या पिकांत तांदुळाचें उत्पादन गरजेच्या मानानें कमी पडतें. त्यामुळें भारताला परदेशांतून गहूं आयात करणें जितकें सोपें जातें तितकें तांदूळ आयात करणें सोपें जात नाहीं. अशा परिस्थितींत भारताचें उत्पन्न वाढविण्याच्या प्रयत्नाबरोबरच उपलब्ध भातापासून अधिकांत अधिक तांदूळ मिळविण्याचे प्रयत्नहि जरूरीचे आहेत.

## चीनच्या लोकसंख्येचें कोडें

जगांतील सर्व देशांत लोकसंख्येच्या बाबतींत चीनचा अनुक्रम पहिला लागतो. परंतु त्या देशाची लोकसंख्या नक्की किती आहे तें निश्चयानें सांगणें अवघड आहे. १९५३ सालीं चीनची शिरगणती करण्यांत आली. शिरगणतीप्रमाणें लोकसंख्येचा आकडा ५८·३ कोटी सांगण्यांत येतो. परंतु हा शिरगणती गुप्तपणें करण्यांत आली असल्यामुळें हा आकडा विश्वसनीय मानण्यांत येत नाहीं. शिरगणतीबद्दल चीन गुप्तता का पाळीत आहे ते समजण्यास मार्ग नाहीं. तथापि, वाढत्या लोकसंख्येच्या धोक्यामुळें चिनी राज्यकर्ते अस्वस्थ झालेले आहेत आणि संततिनियमनाला व त्यांनीं कुटुंबनियंत्रणाला उत्तेजन देण्यास सुरुवात केली आहे. त्याशिवाय निर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रिया आणि भ्रूणहत्या ह्यांनाहि प्रोत्साहन देण्यांत येत आहे. लोकसंख्येच्या वाढीमुळें उत्पन्न होणारे आर्थिक प्रश्नच चीनला तीव्रतेनें भोवत आहेत.

## जर्मन भांडवल आकर्षित करण्यासाठी

इंडियन इन्व्हेस्टमेंट सेंटर ह्या संघटनेनें पश्चिम जर्मनीमधील उद्योगपतींच्या एका गटाला भारतांत येऊन येथील पैसे गुंतविण्यासंबंधी परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी आमंत्रण दिलें आहे. भारताच्या औद्योगिक प्रगतीविषयीं आस्था वाटून जर्मन भांडवल भारतांत आकर्षित करण्यासाठी हा उपक्रम योजण्यांत आला आहे. उद्योगपतींची तुकडी बहुधा येत्या हिंवाळ्यांत भारतांत येईल. भारताच्या ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील औद्योगिक उद्दिष्टें साध्य करण्याच्या कामीं पश्चिम जर्मनी काय मदत देऊं शकेल हें अजामवण्याचा दौऱ्याचा एक उद्देश आहे. सध्यां पश्चिम जर्मनींतील २०० कंपन्या भारतामधील कंपन्यांशीं सहकार्य करीत आहेत. रोजखपाच्या वस्तु, औषधें, यंत्रसामग्री, इत्यादि क्षेत्रांत हें सहकार्य चालू आहे.

## मद्रास राज्यांतील साखरेचे सहकारी कारखाने

मद्रास राज्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारे साखरेचे ६ कारखाने असून त्यांत दररोज जास्तींत जास्त ५,४०० टन ऊंस गाळण्याची व्यवस्था आहे. आणखी तीन सहकारी साखर कारखाने काढण्यासाठी परवानगी मागणारे अर्ज मध्यवर्ती सरकारकडे करण्यांत आले असून त्यांचा विचार चालू आहे. दरम्यान उभ्या असलेल्या कारखान्यांची उत्पादनक्षमता दुपटीनें वाढविण्यांत येणार आहे. सहकारी कारखान्यांची उत्पादनक्षमता इतक्या प्रमाणांत वाढल्यानंतर त्यांची रोजची ऊंस गाळण्याची शक्ति १० हजार टनांपेक्षाहि अधिक होईल. उसाच्या किमतीचा ह्या कारखान्यांना होणाऱ्या उसाच्या पुरवठ्यावर फारसा परिणाम होणार नाहीं अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

## उर्दू कवितांच्या भाषांतरासाठी देणगी

मिर्झा गालिब आणि मीर ह्या इराणी कवींच्या कवितेचें इंग्रजींत भाषांतर करवून घेण्यासाठी अफगाणिस्थानांतील एका गृहस्थानें अमेरिकेंतील हारवर्ड विद्यापीठाकडे आपल्या मृत्युपत्रान्वयें ५ लाख डॉलर्सची देणगी दिली आहे. ह्या रकमेचा उपयोग करून दोन्ही कवींचे ग्रंथ आणि त्यांचें जीवन ह्यासंबंधीं संशोधनहि करण्यांत येणार आहे. भारताचे इजिप्तमधील माजी वकील सय्यद हुसेन ह्यांच्या स्मारकानिमित्त हें भाषांतराचें काम करण्यांत येणार आहे. हें काम करण्यासाठी उर्दू आणि पर्शिअन भाषा जाणणाऱ्या हिंदी प्राध्यापकांची जरुरी विद्यापीठाला लागणार आहे.

**टोकिओला पाण्याचा दुष्काळ**—टोकिओ शहरांतील १·१ कोट रहिवाशांना ह्या महिन्याच्या प्रारंभीं पाण्याच्या तीव्र टंचाईला तोंड यावें लागलें. कारण, पावसाची वक्रदृष्टि. टोकिओमधील वयस्कर रहिवाशांच्या आठवणींत पाण्याचा इतका दुष्काळ पडलेला नाहीं. पावसाच्या अभावीं पाणीपुरवठ्याचा साठा संपला आणि अखेर तहानेलेल्या नागरिकांना लष्कराच्या पाणीपुरवठ्याच्या मोटारीमधून आणलेलें पाणी यावें लागलें.

**पशुवैद्यकासंबंधीं संशोधन केंद्र**—जनावरांच्या व प्राण्यांच्या रोगांसंबंधीं तपासणी करून संशोधन करण्याचें एक केंद्र औरंगाबाद येथें नव्यानें स्थापन करण्यांत आलें आहे. महाराष्ट्रांत अशा प्रकारचें हें तिसरें केंद्र आहे. उरलेलीं दोन केंद्रें पुणें व नागपूर ह्या ठिकाणीं आहेत पशूंना होणारे रोग आणि त्यावर करावयाचे उपाय यासंबंधीं केंद्र लोकांना मार्गदर्शन करील.

**फोर्डफौंडेशनच्या देणग्या**—अमेरिकेंतील फोर्डफौंडेशन ह्या संघटनेनें भारतामधील कुटुंबनियोजनविषयक काम करणाऱ्या संस्थांना तीन देणग्या जाहीर केल्या आहेत. सर्व देणग्यांची मिळून रक्कम ८ लाख, १८ हजार डॉलर्स होते. त्यांपैकीं सर्वांत मोठी देणगी मद्रासमधील गांधीग्राम संस्थेला देण्यांत आली आहे. देणगीची रक्कम ४ लाख, ६५ हजार डॉलर्स आहे. ही संस्था ग्रामीण आरोग्य व कुटुंबनियोजनविषयक काम करते.

**कोळसा खणणारी यंत्रसामग्री**—भारी यंत्रसामग्री तयार करणाऱ्या दुर्गापूर येथील कारखान्यांत कोळशाच्या खाणींत कोळसा खणण्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीचा पहिला संच बनविण्यांत आला आहे. राष्ट्रीय कोळसा विकासमंडळानें त्याची मागणी केली होती. ह्या संचाची चांचणी यशस्वी झाली आहे. त्याच्या साह्यानें दर तासाला २५० टन कोळसा खणून उपसला जाईल.




शेतकरी बंधुनो

# तगाई घ्या आणि उत्पादन वाढवा

शेती उत्पादन वाढविण्यासाठी जी तगाई देण्यात येते ती यापुढे तुम्हाला अधिक सुलभपणे मिळू शकेल. ज्यांना लिहिता वाचता येत नसेल त्यांचे तोंडी अर्जहि सरकारी अधिकारी लिहून घेतील आणि जरूर ती सर्व तजवीज करतील.

**तगाई मार्गदर्शिका**

प्रसिद्धी संचालनाल्याने सोप्या भाषेत एक पुस्तिका प्रसिद्ध केली असून तींत ही व तगाई कर्जाबद्दलची इतर सर्व तपशिलवार माहिती दिली आहे. पुस्तिकेची किंमत फक्त चार आणे आहे. ही पुस्तिका तुम्हाला मुंबईत महाराष्ट्र सरकारचे प्रसिद्धी खाते, सचिवालय मुंबई येथे किंवा तुमच्या जिल्ह्यांत जिल्हा प्रसिद्धी अधिकारी, यांच्याकडे आणि जिल्ह्याच्या कलेक्टरांकडे मिळू शकेल.

**तगाईचे प्रमाण**

ज्या कामासाठी तुम्ही तगाई घेणार त्याचा खर्च, परतफेडीची तुमची कुवत, आणि तुम्ही देणार असलेले तारण यांवर तुम्हाला किती तगाई मिळेल ते अवलंबून राहिल. पण दरएकरी तारणास तुम्हाला कमित कमी ३७५ रु. तगाई मिळेल हे निश्चित.

**वाटप केंद्रे**

तगाईच्या वाटपासाठी प्रत्येक रेव्हेन्यू सर्कलमध्ये तुमच्या सोयीची अशी कांही केंद्रे मुकर केलेली असतात. तेथे तुम्हाला कर्ज मिळू शकेल.

**कोणाकडून मिळेल?**

महाराष्ट्र सरकारचे शेती, महसूल, ग्रामविकास आणि समाज कल्याण हे विभाग, तसेंच बँबे को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक व इतर सहकारी संस्था यांच्याकडून तुम्हाला तगाई मिळेल.

**अधिक माहिती कोठे मिळेल?**

महसूल अधिकारी; जिल्हा परिषदेचे गट विकास अधिकारी; पुणे येथील सरकारी शेती खात्याचा माहिती विभाग; आणि मुंबई राज्य सहकारी लँड मॉर्गेज बँकेचे व्यवस्थापक, जे. के. बिल्डिंग, डुगल रोड, बेलार्ड एस्टेट, मुंबई–१ यांच्याकडे अधिक माहिती मिळू शकेल.



प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन

**सिमेंटच्या कारखान्यांची विक्री**—पाकिस्तानांत असणाऱ्या दालमियांच्या सिमेंट कारखान्यांची विक्री करण्याची परवानगी पाकिस्तान सरकारनें दिली आहे. विक्रीची किंमत २.०८ कोटी रुपये ठरविण्यांत आली आहे. मात्र ही किंमत एकदम देण्यांत येणार नसून तीन वर्षांच्या काळांत चुकती करण्यांत येणार आहे, आणि तीहि भारताला सिमेंटची निर्यात करून. दरसाल ७५ हजार ते १ लाख टन सिमेंट निर्यात करण्यांत येईल. सिमेंटची निर्यातीची किंमत दर टनामागें ९४ रुपये ठरविण्यांत आली आहे.

**निर्जल मांसाचा कारखाना**—भारताच्या सरहद्दीवर पहारा करणाऱ्या लष्कराला मांसाचा पुरवठा करतां यावा म्हणून संरक्षणखातें राजस्थानमध्यें निर्जल मांसाचा कारखाना काढणार आहे. ह्या कारखान्यांत दररोज २५ टन निर्जल मासाचें उत्पादन करण्यांत येईल. वाहतुकीपासून दूर असलेल्या सरहद्दीवरील जवानांना टिकाऊ अन्नाची विशेष गरज असते. निर्जल मांस अधिक काळ टिकूं शकतें. कारखान्यासाठी ७९ लाख रुपये खर्च येईल.

**तिबेटमध्यें शस्त्रास्त्रांचा कारखाना**—ल्हासाच्या दक्षिणेला १० मैलांवरील एका ठिकाणीं चीननें शस्त्रास्त्रांचा कारखाना उभारला आहे. तिबेटमध्यें स्थापन करण्यांत आलेला हा पहिलाच शस्त्रास्त्रांचा कारखाना आहे. ह्या कारखान्यांत हलक्या बंदुका, स्वयंचलित बंदुका, हलक्या तोफा, इत्यादींची निर्मिती करण्यांत येणार आहे. १९६२ च्या अखेरीस चीननें भारतावर केलेल्या हल्ल्याच्या प्रसंगीं चिनीला सर्व लष्करी साहित्य लांब अंतरावरून वाहून आणावें लागलें होतें. वाहतुकीच्या अडचणीमुळेंच चीननें भारतावरील हल्ला माघारी घेतला; असा एक अभिप्राय व्यक्त करण्यांत आलेला आहे.

**रोखीचीं पिकें व अन्नधान्याचीं पिकें**—भारतांत सध्या भासत असलेल्या अन्नधान्याच्या टंचाईचें एक कारण म्हणून रोखीच्या पिकाखालीं असणाऱ्या जमिनींत झालेली वाढ सांगण्यांत येतें. उत्तर प्रदेशांत गेल्या वर्षीं अन्नधान्याच्या उत्पादनाखालीं असणारी जमीन उसासारख्या पिकाकडे वळविण्यांत आली अशी तक्रार करण्यांत येत आहे. रोखीचीं पिकें व अन्नधान्याचीं पिकें ह्यांच्यांतील प्रमाण ठरवून देण्यास राज्य सरकारांना मोकळीक आहे.

**पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठीं**—पश्चिम जर्मनींतील एका शहरांतील पादचाऱ्यांना रस्ता सुरक्षितपणें ओलांडतां यावा म्हणून पिवळीं निशाणें देण्यांत आलीं आहेत. रस्ता ओलांडत असतां त्यांनीं हीं निशाणें हलवावयाचीं आहेत. मोटारहाक्याचें लक्ष वेधण्यासाठी ही युक्ति योजण्यांत आली आहे. रस्ता ओलांडल्यावर निशाणांसाठी ठेवलेल्या एका पेटींत पादचाऱ्यांनीं तीं टाकावयाचीं असतात. टोकिओ शहरांतहि ही युक्ति अवलंबिण्यांत आली आहे.

**गुजरात राज्यांत नवे साखर कारखाने**—गुजरात सरकारनें साखरेचे तीन नवीन कारखाने काढण्याचें ठरविलें आहे. सर्व कारखान्यांना मिळून ६ कोटी रुपये भांडवल लागेल. प्रत्येक कारखान्यांत रोज १ हजार टन ऊंस गाळूं शकणारी यंत्रसामग्री बसविण्यांत येणार आहे. कारखाने सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणार आहेत. नवीन कारखान्यांपैकी दोन कारखाने सुरत जिल्ह्यांत आणि एक जुनागड जिल्ह्यांत काढण्यांत येणार आहे. त्याशिवाय गुजरात राज्यांत असणाऱ्या दोन कारखान्यांचा विस्तारहि करण्यांत येणार आहे.


# किडी, रोगांना देऊं नका थारा,
# त्यावर करा औषधांचा मारा—

सावधान, या काळांत खरीप पिकांवर रोग व कीड पडावयास सुरुवात होत असते.,...
तेव्हां,
बेसावध राहून त्यांचा प्रसार होऊं देऊं नका......
हे उपाय योजा......

पिकांत तण वाढूं देऊं नका, आंतरमशागत करून पिकें निर्मळ ठेवा.
पिकांच्या योग्य वाढीकरितां त्यांना वरखतें द्या.
रोग व किडीवर तावडतोब रोग व कीडनाशक औषध फवारा.
मोकाट गुरांपासून पिकांची राखण करा.
जवळच्या शेतकी अधिकाऱ्यांचा सल्ला घ्या.

— आणि —

**खरीप पिकांचें संरक्षण करून खरीप पीक उत्पादन मोहीम यशस्वी करा.**

### भात सडण्याची यंत्रसामग्री परदेशी कशाला ?

चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस सार्वजनिक मालकीच्या विभागांत व सहकारी विभागांत भात सडण्याच्या गिरण्या स्थापन करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. २ कोटी टन भात सडून त्याचा तांदूळ बनवितां येईल इतक्या कार्यक्षमतेच्या त्या असणार आहेत. ह्या गिरण्यांना लागणारी यंत्रसामग्री परदेशांतून आणण्याचें ठरविल्यामुळें मात्र सरकारवर टीका करण्यांत येत आहे. अशा प्रकारची गिरण्यांना लागणारी यंत्रसामग्री भारतांतच तयार करता येणें शक्य असल्यानें परदेशाहून तिची आयात करण्याची जरूर नाहीं असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. भारतामध्यें भाताच्या गिरणीची यंत्रसामग्री तयार करणारे कारखाने असून त्यांच्याकडे निर्मितीची मागणी करण्यांत आल्यास तीन महिन्यांच्या अवधींत यंत्रसामग्री मिळूं शकेल. गिरण्यांची यंत्रसामग्री बनविण्याच्या बाबतींत भारत सरकारनें नमुने दाखविल्यास त्याप्रमाणें ती बनवितां येणें शक्य आहे. भाताच्या गिरण्यांची यंत्रसामग्री देशांतच तयार करणारा कारखाना असून त्यानें कांहीं संपूर्ण गिरण्या आशिआंतील कांहीं देशांना निर्यातहि केलेल्या आहेत. भारत सरकार इटली आणि पश्चिम जर्मनीकडून संबंधित यंत्रसामग्री आयात करण्याचा विचार करीत आहे. परंतु ही यंत्रसामग्री भारताला उपयोगी पडण्यासारखी नाहीं, असें म्हणतात. शिवाय, संकल्पित आयात २ टन क्षमतेच्या गिरण्यांची आहे. एवढ्या लहान गिरण्या आयात करण्यांत फायदा होणार नाहीं. १ ते २० टन क्षमतेच्या गिरण्या असणें उत्पादनाच्या दृष्टीनें अधिक सोयीस्कर ठरणार आहे. सहकारी तत्त्वावर अशा गिरण्या चालू झाल्यास महाराष्ट्रांत सहकारी क्षेत्राचा आणखी विस्तार होईल.

---

### मोठ्या शहरांतील गलिच्छ वस्त्यांचा प्रश्न

हिंदमधील मोठ्या शहरांतून असलेल्या गलिच्छ वस्त्या उठवून त्या ठिकाणीं तेथील रहिवाशांसाठी गाळे बांधण्याची एक योजना मध्यवर्ती सरकारनें १९५६ मध्यें आंखली होती. ह्या योजनेप्रमाणें राज्यसरकारें गलिच्छ वस्त्यांच्या उच्चाटनासाठी जो खर्च करतील त्याच्या ७५ टक्के रक्कम मध्यवर्ती सरकार देणार होतें. आर्थिक मदतीची इतकी तयारी दाखविण्यांत आल्यावर सुद्धां योजनेची जितकी प्रगति व्हावयास पाहिजे होती त्या मानानें ती अगदींच बेताची झालेली आहे. मोठ्या शहरांतील गलिच्छ वस्त्यांच्या उच्चाटनाच्या कामाला कॉर्पोरेशन्सनीं आणि इतर स्थानिक स्वराज्यसंस्थांनीं अग्रहक्क द्यावा अशी सरकारची इच्छा होती. ह्या प्रश्नाचें गांभीर्य स्पष्ट करण्यासाठी १९६२ च्या ऑक्टोबरमध्यें शहरांचे मेयर्स आणि म्युनिसिपल कमिशनर्स ह्यांची एक परिषद्हि भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेचा फारसा उपयोग न होता गलिच्छ वस्त्यांच्या उच्चाटनाचा प्रश्न अद्यापहि भिजतच पडलेला आहे. मध्यवर्ती सरकारच्या गृहनिर्माण खात्यानें आतां अशी सूचना केली आहे कीं, कॉर्पोरेशन्सनीं आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनीं ह्या कामासाठी एक स्वतंत्र खातेंच काढावें. ह्या खात्यांनीं आपल्या अखत्यारांत असलेल्या गलिच्छ वस्त्यांची पहाणी करावी आणि प्रश्नाची व्याप्ति किती मोठी आहे ह्यासंबंधीं अंदाज घ्यावा. त्यानंतर गलिच्छ वस्त्या उठविण्यासाठी टप्प्यानें पूर्ण करण्यांत यावयाचा १५ वर्षे मुदतीचा कार्यक्रम सुचविण्यांत यावा. गलिच्छ वस्त्या उठविण्यासंबंधीं मध्यवर्ती सरकारनें १९५६ सालीं कायदा मंजूर केला. त्यानंतर मध्यवर्ती सरकारच्या आदेशांप्रमाणें बऱ्याच राज्यसरकारांतहि असेच कायदे मंजूर केले. गुजरात, महाराष्ट्र, ओरिसा व राजस्थान ह्या राज्यांत मात्र अजून कायदे झालेले नाहींत.

### भिलई पोलाद कारखान्याचा विस्तार

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भिलई येथील पोलाद कारखान्याचा विस्तार करण्यांत यावयाचा आहे. त्यासंबंधी विचार विनिमय करण्यासाठी कारखान्यांतील अधिकाऱ्यांचें एक मंडळ मॉस्कोला गेलें होतें. मंडळाचें नेतृत्व कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. इंद्रजितसिंग ह्यांनीं केलें. विस्ताराच्या कार्यक्रमाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं ह्या कार्यक्रमाचा पहिला टप्पा ह्या वर्षअखेर पूर्ण करण्यांत येईल. विस्ताराच्या कामाची चर्चा मॉस्कोमधील रशिअन तज्ज्ञांशीं करण्यांत आली आणि ती बरीच उपयुक्त ठरली. चालू वर्षी विस्ताराचें काम करण्यासाठी जितक्या यंत्रसाहित्याची गरज आहे तितकी रशिआकडून पाठविण्यांत येत आहे. विस्ताराचें काम पूर्ण झाल्यावर कारखान्याची उत्पादनक्षमता दरसाल ३५ लाख टनांची होईल. आणि त्यानंतर हळुहळु ती ४० लाख टनांपर्यंत जाईल, इतकी प्रचंड उत्पादनक्षमता असलेला हा आशिआतील पहिलाच कारखाना होईल. जपानमध्यें सुद्धां इतका मोठा पोलादाचा कारखाना नाहीं. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ४० लाख टन वार्षिक उत्पादनाचें लक्ष्य गांठता येईल असें वाटतें. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत करावयाच्या कारखान्याच्या विस्ताराचा अहवाल आजच तयार करण्यांत आलेला आहे. ह्या अहवालाचा अभ्यास रशिअन तज्ज्ञ करणार आहेत. चालू महिन्यांत रशिअन तंत्रज्ञांची एक तुकडी भारतांत येणार असून त्या वेळीं हिंदी तज्ज्ञ अहवालावर चर्चा करणार आहे. भिलई कारखान्यांत त्यांच्या संकल्पित उत्पादनाचेंहि अधिक उत्पादन होऊं लागलेलें आहे. उत्पादनाच्या कामांत हिंदी एंजिनिअर्सना रशिअन तंत्रज्ञांनीं दिलेलें सहकार्य मोलाचें ठरलेलें आहे.

---

### उत्पादकता वाढविण्याची तांतडीची आवश्यकता

हिंदच्या नियोजन समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता ह्यांनीं उद्योगधंद्यांत व शेतींत उत्पादकता वाढविण्यावर देशाचें भवितव्य अवलंबून आहे, असा इषारा आपल्या भाषणांत दिला आहे. नवी दिल्ली येथें स्थानिक उत्पादकता-मंडळांची दोन दिवसांची परिषद् भरविण्यांत आली होती. त्यांत बोलतांना श्री. अशोक मेहता म्हणाले कीं शेती काय किंवा उद्योगधंद्रे काय दोन्हींत उत्पादकता वाढविणें नुसतें इष्टच नव्हे तर तांतडीच्या गरजेचें आहे. प्रो. अर्नोल्ड टॉयन्बी ह्या इतिहासकारानें असें दाखवून दिलें आहे कीं, गतकालांतील अनेक समाज-संस्कृति त्यांच्या अर्थव्यवस्थेंत उत्पादनाची वाढ खुंटल्यामुळें लयाला गेल्या आहेत. उत्पादकता वाढविण्यास तांत्रिक सुधारणा केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. अशा सुधारणांशिवाय शेतीच्या उत्पादनांत वाढ होणें अशक्य आहे. भारतांत अजूनहि परंपरागत पद्धतीनेंच शेती करण्यांत येत आहे. गेल्या १२ वर्षांत जें नियोजन करण्यांत आलें त्यामुळें परंपरागत पद्धतीच्या चौकटींतील उत्पादनाच्या मर्यादा संपून गेल्या आहेत. औद्योगिक उत्पादनाच्या बाबतींत जपानपासून काय शिकता येईल ह्याचा विचार करण्यांत आला पाहिजे. जपानमध्यें असें आढळून आलें कीं, ज्या कारखान्यांतून ४० पर्यंत कामगार काम करतात तेथील उत्पादकता जास्तींत जास्त आहे. अर्थात् अशा कारखान्यांतून रोजगाराच्या वेतनाची पातळी फार उच्च असत नाहीं. भारताची लोकसंख्या वाढत आहे आणि येथें भांडवलाचा तुटवडा आहे. त्याचबरोबर परदेशीय चलन आणि कुशल तंत्रज्ञ ह्यांचेंहि दुर्भिक्ष आहे. अशा परिस्थितींत कोणत्या प्रकारची औद्योगिक व्यवस्था हितकारक ठरेल हा खरा प्रश्न आहे.

**दंतवैद्यकाहि पुरेसे नाहींत**—भारतांत सध्यां दर ७५ हजार नागरिकांमागें अवघा एकच दंतवैद्य आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतहि दंतवैद्यांची ही टंचाई दूर होणार नाहीं. १९७१ च्या सुमारास प्रत्येक ४ हजार लोकांमागें एक तरी दंतवैद्य असावा अशी शिफारस करण्यांत आलेली आहे. हें प्रमाण गांठण्यांत आलें तरीसुद्धां १९७१ च्या सुमारास देशांत ५४०० दंतवैद्य असतील.

**हृदयविकाराचीं कारणें**—मुंबई येथील प्रसिद्ध हृदयविकारतज्ज्ञ श्री. व्ही. व्ही. शहा ह्यांनीं हृदयविकारावर बोलतांना असें सांगितलें कीं, हृदयविकाराच्या अनेक कारणांपैकी राहण्याची अपुरी जागा हें एक कारण आहे. त्याशिवाय आनुवंशिक गुणदोष अयुक्त आहार, व्यवसायांतील दगदगी, अतिरिक्त धूम्रपान, मधुमेह इत्यादी कारणामुळेंहि हा विकार संभवतो. भारतात ४० ते ६० वर्षें वयाच्या गटांतील वरिष्ठ अधिकारी वर्गांत ह्या विकाराचें प्रमाण विशेषेंकरून अधिक आढळून येतें. ३० ते ४० वर्षें वय असलेल्यांनीं नियमितपणें वैद्यकीय तपासणी करून घेण्याचाहि इषारा त्यांनीं दिला.

**भारताचें नेपाळला सहाय्य**—भारतानें नेपाळला देऊं केलेल्या १ कोटी रुपये कर्जाचा उपयोग करून तेथें बरेच उद्योगधंदे काढण्यांत यावयाचे आहेत. ह्या उद्योगधंद्यांत एक कापड गिरणी, एक फार्निचरचा कारखाना, एक साबणाचा कारखाना आणि एक लोकरीचा कारखाना ह्यांचा समावेश आहे. हे सर्व कारखाने नेपाळ व भारत ह्यांच्या संयुक्त मालकीचे असतील.

**पॅरिसमध्यें वसतिगृह**—पॅरिस विद्यापीठांत विद्याभ्यासासाठी जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह बांधण्यांत येणार आहे. वसतिगृहांत १०० खोल्यांची सोय करण्यांत येईल. इमारतीच्या बांधकामाला सप्टेंबरमध्यें प्रारंभ होईल आणि १९६६ मध्यें ती बांधून पुरी होईल. सध्यां पॅरिस विद्यापीठांत ५० हिंदी विद्यार्थी शिकत आहेत. पण त्यांची राहाण्याची नीटशी सोय नाहीं.

**पूरसंरक्षक विमा–योजना?**—मध्यवर्ती सरकारनें आणि राज्य सरकारांनीं जलप्रलयापासून रक्षण करण्यासाठी जे उपाय योजले आहेत त्यांची पहाणी करण्यासाठी १४ सदस्यांची एक पूर–नियंत्रण–कमिटी नेमण्यांत आलेली आहे. कमिटी आपला अहवाल चालू वर्षअखेर सादर करील असा अंदाज आहे. ज्या भागांना पुराचा धोका नेहमीं पत्करावा लागतो त्या भागांकरतां एखादी पूरसंरक्षक विमायोजना तयार करतां येईल किंवा काय ह्या प्रश्नाचा कमिटी आपल्या अहवालांत विचार करणार आहे.

**राज्यांतील घर बांधणीचा कार्यक्रम**—मध्यावर्ती सरकारकडे आलेल्या माहितीवरून राज्यांतील घरबांधणीच्या कार्यक्रमांत फारच अल्प प्रगति झालेली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत राज्य सरकारांनीं ह्या कामावर ८०.२९ कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविलें होतें. पण फक्त २७.०२ कोटी रुपयेच प्रत्यक्ष खर्च झालेले आहेत. तिसऱ्या कार्यक्रमाच्या चौथ्या वर्षासाठी राज्य सरकारांनीं १२.८५ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★



**सार्वजनिक सुट्ट्या : वर्षातले २० % दिवस काम नाहीं**

भारतांत सार्वजनिक सुट्ट्यांची संख्या उद्योगप्रधान देशांतील संख्येपेक्षा खूपच ज्यास्त आहे. ह्या सुट्ट्या कमी कशा करतां येतील, ह्याचा विचार फारशा तळमळीनें कुणी करीत नाहीं. पण इकडे नव्या नव्या सुट्ट्यांची भर पडत आहे. १९६४ मधील सुट्ट्यांचा विचार केला, तर सर्व राज्यांत जम्मू आणि काश्मीरचा अनुक्रम सर्वांत वर लागतो. विभागीय सुट्ट्या वगळूनहि त्या राज्यांत ३० दिवस सुट्टीचे आहेत. दुसऱ्या टोकाला आंध्रप्रदेश आहे; त्यांत फक्त १४ सुट्टीचे दिवस आहेत. रविवारच्या सुट्टीचे दिवस धरले, तर सर्व राज्यांत वर्षांतील २०% दिवस सुट्टी असते, असा हिशेब होतो. त्यांत विभागीय सुट्ट्या मिळविल्या, तर हें प्रमाण आणखी वाढलेलें आढळेल.

**१९६४ मधील सार्वजनिक सुट्ट्या**

| | सुट्ट्यांची संख्या |
|---|---|
| १. आंध्र प्रदेश | १४ |
| २. बिहार | २० |
| ३. गुजरात | १८ |
| ४. जम्मू आणि काश्मीर | ३० |
| ५. मध्य प्रदेश | १५ |
| ६. मद्रास | १६ |
| ७. महाराष्ट्र | १६ |
| ८. ओरिसा | १६ |
| ९. पंजाब | १५ |
| १०. राजस्थान | २० |
| ११. उत्तर प्रदेश | २१ |
| १२. प. बंगाल | २२ |
| १३. मध्यवर्ती सरकार | १६ |

बिहार, गुजरात, जम्मू आणि काश्मीर, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि प. बंगाल ह्यांनीं सुट्ट्या कमी करण्याची आवश्यकता आहे. कोणत्या सुट्ट्या कमी कराव्या, हें ठरविणें अवघड नाहीं. कारण, त्या बाबतींत परंपरेपेक्षा जास्त समर्थन करण्याजोगें विशेष कांहीं नसतें. उदाहरणार्थ, गुजरात, मध्यप्रदेश, मद्रास इत्यादि राज्यांतून १ जानेवारीला सुट्टी नसते व इतर कित्येक राज्यांतून ती असते. गुडफ्रायडेचीहि तशीच हकीकत आहे; कांहीं राज्यें ती सुट्टी देतात, कांहीं देत नाहींत. इतरहि कित्येक सुट्ट्यांचे बाबतींत (बुद्धजयंति, रमझान, मोहरम, ईद, इत्यादि) असेंच घडतें. जास्त सुट्ट्या देणाऱ्या राज्यांतून सुट्ट्यांची संख्या कमी करायला अशा रीतीनें भरपूर वाव आहे.

**कुटुंबनियोजनासाठी अधिक तरतूद**

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कुटुंबनियोजनाच्या कामासाठी १०१ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत यावी अशी सूचना मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य खात्यानें नियोजन समितीला केली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या कामासाठी अवघी २६ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. आर्थिक विकास साधण्याच्या कार्यांत कुटुंबनियोजनाला असणारें महत्त्व लक्षांत घेऊन ४ थ्या व पांचव्या कार्यक्रमांत त्याला विशेष प्राधान्य देण्यांत येणार आहे. सध्यांची दर हजारी जननसंख्या कमी करून ती २५ पर्यंत खालीं आणणें हें नजीकचें उद्दिष्ट म्हणून ठरविण्यांत येण्याचा संभव आहे. कुटुंबनियोजनाची माहिती देणाऱ्या केंद्रांच्या संख्येंत वाढ करणें, नियोजनाच्या कृत्रिम साधनांचें उत्पादन करणें, प्रचार करणें, इत्यादि बाबींवर पुढील योजनांत अधिक भर देण्यांत येणार आहे.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

अगा स्वधर्मु हा आपुला । जरी कां कठिणु जाहला ।
तरी हाचि अनुष्ठिला । भला देखें ॥ —श्रीज्ञानेश्वरी

## भारतीय स्वातंत्र्याचा जयजयकार असो !

कंपनी यशस्वी करण्यांत कंपनीचे कर्तबगार मॅनेजिंग एजंट कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे यांच्या अविरत श्रमाला व संचालक मंडळाच्या धोरणाला ज्यांनीं साहाय्य व सहकार्य दिलें त्या सर्व भागीदार, ठेवीदार व हितचिंतकांना आजच्या स्वातंत्र्यदिनीं अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !

पुढील हंगामापासून स्पिरिटचें उत्पादन चालू उत्पादनापेक्षा दुप्पट होईल. त्यासाठी स्पिरिटचें रोजचें उत्पादन ४,००० गॅलन होईल इतक्या कपॅसिटीच्या मशिनरीची ऑर्डर दिली होती व ह्या मशिनरीपैकी बहुतेक मशिनरी फॅक्टरीवर आली असून मशिनरीच्या इरेक्शनच्या कामास सुरुवात झाली आहे. डिसेंबर १९६४ पासून स्पिरिटच्या वाढत्या उत्पादनास सुरुवात होईल व अशा तऱ्हेनें कंपनीचें प्रगतिपथावर आणखी एक पाऊल पडेल.

### साखरेचा नवीन हंगाम नोव्हेंबर १९६४ मध्यें सुरू होईल.

— संचालक मंडळ —

श्री. शं. ल. लिमये, B. Sc., LL. B. वकील, अध्यक्ष.

श्री. भ. ग. भाडुले, B. Sc., LL. B.
श्री. रा. भा. देशमुख, वकील M. A. LL. B. (Cant.) Bar-at-Law
श्री. वि. कृ. साठे, B. A. (दिल्ली) माजी पुरवठामंत्री (मुंबई राज्य)

श्री. ग. ह. सवनीस
श्री. श्री. र. केसकर, ॲडव्होकेट
श्री. ज. चं. आगाशे
श्री. गो. न. जोशी, B. Sc.
श्री. रा. ह. केळकर, B. Com., F. C. A.

श्री. गो. श्री. वाळिंबे, B. Com., ऑफिशिएटिंग मॅनेजर.

### दोन अध्यक्षांच्या वधांतील विलक्षण साम्य

अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिंकन आणि जॉन केनेडी ह्यांचा वध झाला. त्यांच्या वधाच्या बाबतींतील घटनांत आश्चर्यकारक साम्य आढळून येतें. दोघांचाहि वध नागरिक हक्कांच्या प्रकरणाबाबत झाला. प्रे. लिंकन हे १८६० सालीं निवडणूक जिंकून अध्यक्ष झाले. प्रे. केनेडी १९६० सालीं अध्यक्ष झाले. दोघांचाहि खून शुक्रवारीं झाला आणि तोहि त्यांच्या पत्नींच्या डोळ्यांदेखत झाला. दोघांनाहि मारेकऱ्यांनीं मागून डोक्यांत गोळ्या घातल्या. त्यांच्यानंतर अधिकारपदावर आलेल्या अध्यक्षांचीं नांवें जॉन्सन अशींच आहेत आणि ते दोघेहि दक्षिणेकडील डेमोक्रॅटिक पक्षाचे व सिनेटचे सभासद होते. लिंकननंतर अध्यक्ष झालेले अँड्र्यू जॉन्सन १८०८ सालीं जन्म पावले होते. तर लिंडन जॉन्सन १९०८ सालीं जन्मलेले आहेत. लिंकनचा खून करणारा जॉन बूथ व केनेडीचा खून करणारा ली ओस्वाल्ड हे दोघेहि अमेरिकेच्या दक्षिण राज्यांतील होते आणि दोघेहि अप्रिय मतें धारण करणारे होते. ह्या दोघांचेहि त्यांच्यावर खटला भरण्यांत येण्यापूर्वीच खून करण्यांत आले. अमेरिकेच्या अध्यक्षांचें निवासस्थान व्हाइट हौस येथें राहात असतांना दोघांहि अध्यक्षांना मुलांना मुकावें लागलेलें आहे. लिंकनच्या चिटणिसाचें नांव केनेडी होतें व त्यानें लिंकनला नाट्यगृहांत न जाण्याबद्दल इशारा दिला होता. केनेडींच्या चिटणिसाचें नांव लिंकन असें होतें व त्यानेंहि केनेडी ह्यांना डॅलास संस्थानचा दौरा न करण्याबद्दल सांगितलें होतें. लिंकनचा मारेकरी बूथ ह्यानें लिंकनला नाट्यगृहांत गोळी घातली आणि नंतर तो एका गुदामाकडे पळून गेला. ली ओसवाल्ड ह्यानें केनेडी ह्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला तो एका गुदामामधून आणि त्यानंतर तो एका चित्रगृहाकडे पळून गेला. ही योगायोगांची मालिका अद्भुतच गणावी लागेल.

---

### दुसऱ्याच्या रिझर्व्हेशनवर प्रवास करूं नका

दुसऱ्याच्या नांवावर रिझर्व्ह केलेल्या तिकिटानें प्रवास करणें गुन्हा आहे, असें सेंट्रल रेल्वेनें एक प्रेस नोट काढून जाहीर केलें आहे. श्री. एस. एल. बळिराम हे दुसऱ्याच्या नांवानें रिझर्व्ह केलेल्या स्लीपरबर्थनें प्रवास करीत असतांना सांपडले. तेव्हां त्यांना २५ रु. दंड किंवा ७ दिवस कारावास, अशी शिक्षा मिळाली. अनधिकृत माणसांकडून तिकिटें विकत न घेण्याचा इशारा प्रेस नोटनें दिला आहे.

---

### जगांतील पहिल्या ५०० बँकांत सहा हिंदी बँकांना स्थान

"स्वतंत्र जगांतील" पहिल्या पांचशे बँकांत सहा हिंदी बँकांचीं नांवें आढळतात. ही यादी ठेवींच्या रकमेच्या अनुक्रमानें तयार केलेली आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाचा अनुक्रम ७२ वा असून सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा १७३ वा आहे. पंजाब नॅशनल बँकेचा २४० वा, बँक ऑफ इंडियाचा २५८ वा, बँक ऑफ बरोडाचा ३१५ वा आणि युनायटेड कमार्शिअल बँकेचा ३६० वा आहे.

---

### परदेशी मासिकांच्या चोरीला आळा

पोस्टानें येणारीं विदेशी मासिकें गहाळ होतात. त्यासंबंधीं पोस्ट खात्याच्या डायरेक्टर जनरलनें चौकशी केली, तेव्हां संघटित गुंडांचें तें काम असल्याचें आढळून आलें. हीं मासिकें अशा रीतीनें चोरून बाजारांत विकलीं जातात. मासिकांची चोरी न होऊं देण्यासाठी आणि चोर पकडण्यासाठी प्रत्येक राज्यांतील पोस्ट मास्टर जनरलच्या कचेरींत अधिकारी नेमण्यांत येत आहेत.


सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दी दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५ " |
| ठेवी | ... | रु. | ४१४ " |
| खेळतें भांडवल | ... | रु. | ४५० " |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.




स्थापना १९१८

AICO



महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हॅंड पंप्स्, हॅंड रहाट इ. इ.

– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)



माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

### पाकिस्तानचे अणुशक्तीसाठी प्रयत्न

पाकिस्तान आशिआंतील एक अणुशक्तिसंपन्न देश म्हणून मान्यता मिळविण्याची जोराची खटपट करीत आहे. कॅनडाच्या मदतीनें पाकिस्तानांत एक छोटेसें अणुशक्तिचलित वीज-केंद्र बांधण्याचे प्रयत्न चालू आहेत. अजून अणुशक्तीचा हा कार्यक्रम वाटाघाटीच्या स्वरूपांतच आहे. तथापि पाकिस्तान आणि कॅनडा ह्यांच्या दरम्यान चालू वर्ष संपण्याच्या अखेरीपर्यंत १०० मेगॅवॅट शक्तीची अणुभट्टी बांधण्याबाबत करार होण्याचा बळकट संभव आहे. अणुभट्टी उभारण्याच्या कामीं कॅनडा पाकिस्तानला आर्थिक व तांत्रिक साह्य देईल, आणि त्याचबरोबर पाकिस्तानच्या तंत्रज्ञांना आणि एंजिनिअर्सना कॅनडांत शिक्षण देण्याचीहि सोय करील. भारतांत राणा प्रतापसागर येथें ज्या तऱ्हेचें अणुवीज केंद्र उभारण्यांत यावयाचें आहे, त्याच तऱ्हेचें केंद्र पाकिस्तानांत उभारलें जाण्याची शक्यता आहे. ज्या ठिकाणीं उष्णतेवर वीज निर्माण करणें महाग पडत असेल त्या ठिकाणीं अणुवीज केंद्र उभारण्याचा पाकिस्तानचा मानस आहे.

### व्यापाराचा राजकारणाशीं संबंध नाहीं

चीनच्या कम्युनिस्ट राजवटीला संयुक्त राष्ट्रसंघटनेंत प्रवेश देण्याबाबत ब्रिटन अमेरिकेचीच री ओढत असते. चीनला संघटनेंत प्रवेश देण्यासंबंधीं ब्रिटनचा विरोध असला तरी त्याच्याशीं व्यापार करण्याची बाब मात्र अलग दिसते. साठसत्तर कोटी लोकसंख्या असलेल्या चीनच्या बाजारपेठेचें महत्त्व फ्रान्स, पश्चिम जर्मनी, इटली, जपान, इत्यादी देशांना वाटतें, तसेंच तें ब्रिटनलाहि वाटतें. ब्रिटन आतां चीनसाठी बोटी बांधण्याचीं कंत्राटें घेणार आहे. गेल्या वर्षी ब्रिटिश कारखानदारांनीं पेकिंग येथें दोन प्रदर्शनें भरविलीं होतीं. एक शास्त्रीय उपकरणांचें होतें व दुसरें खाणींच्या यंत्रसामग्रीचें होतें. आतां आणखी एक औद्योगिक प्रदर्शन, पेकिंग येथें भरविण्यांत येणार असून त्यांत १०० प्रमुख ब्रिटिश कारखाने भाग घेणार आहेत. ह्या उपक्रमाला ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडचाहि पाठिंबा आहे.

### पाठ्यपुस्तकांचें राष्ट्रीयीकरण: किमतींत वाढ

गेल्या १७ वर्षांत शाळांच्या पाठ्यपुस्तकांच्या किमती १००% वाढल्या आहेत; त्यांतहि हिंदी पुस्तकें जास्तच महागलीं आहेत असा सेंट्रल ब्यूरो ऑफ टेक्स्टबुक रिसर्चचा निष्कर्ष आहे. अधिकाधिक राज्यसरकारें पाठ्यपुस्तकें छापूं लागलीं आहेत, पण फारच थोडीं सरकारें पडलेल्या किमतीला तीं विकतात. कांहीं राज्यांच्या नफ्याचें प्रमाण ८० ते १००% आहे. त्यांत पंजाब अग्रेसर आहे. पांचव्या इयत्तेच्या अंकगणिताच्या पुस्तकाची किंमत आंध्रप्रदेशांत रु. १·२५, बिहारमध्यें रु. १·४७, जम्मू आणि काश्मीरमध्यें रु. ०·७५, पंजाबमध्यें रु. १·१२, राजस्थानांत रु. ०·९२ अशी आढळली.

### भरपूर पावसामुळें विजेची समृद्धि

पावसामुळें लाकूड-कोळसे सर्द होतात आणि जळण ओलसर होऊन जाते. पण, औद्योगिक युगांत त्याच्या उलट चमत्कार घडून येतो. पावसामुळें धरणें तुडुंब भरतात आणि विजेचें उत्पादन भरपूर करतां येतें. दक्षिण भारतांतील धरणें पाण्यानें भरून गेलीं असून त्यांच्या भिंतींवरून पाणी वाहूं लागलें आहे. कांहीं आठवड्यांपूर्वी ह्याच्या अगदीं उलट परिस्थिति होती; धरणांतील पाणी आटल्यामुळें विद्युतगृहांतील यंत्रें बंद पडण्याची पाळी आली होती.

**शिक्षणाशिवाय तरणोपाय नाहीं**—अशिक्षित माणसाला नोकरी मिळण्याचे दिवस आतां भूतकालांत जमा होत चालले आहेत. कारण, मालकवर्ग अगदीं साध्यासुध्या मामुली कामासाठी मॅट्रिक नसलेल्या लोकांची निवड करीनासा झाला आहे. कोणतेंहि कौशल्य न लागणाऱ्या कामासाठीहि शिक्षित नोकर नेमण्याची प्रवृत्ति ह्यापुढें अधिकच प्रबळ होत जाणार आहे, अशीं लक्षणें दिसत आहेत.

**भविष्य सांगण्यासाठी सुद्धां यंत्रें**—टोकिओ शहरांत भविष्य सांगून योगक्षेम चालविणारे वृद्ध ज्योतिषी आहेत. त्याचबरोबर विजेच्या साह्यानें चालणारीं भविष्य सांगणारीं यंत्रेंहि आहेत. ह्या यंत्रांवर १२ महिन्यांसाठी १२ कळा असतात. भविष्य जाणून घेणारानें त्यांत नाणें टाकून आपल्या जन्ममहिन्याची कळ दाबली कीं त्याला यंत्राला जोडलेल्या टेलिफोनमधून स्वतःचें भविष्य कळतें.

**चित्रपट संस्थेवर दावा**—न्यूयॉर्कमधील फॉक्स चित्रपट संस्थेवर एका चिंपाझी वानरातर्फे १ लाख डॉलर्सचा दावा लावण्यांत आला आहे. गेल्या वर्षी चित्रपटकंपनीतर्फे चिंपाझी वानरांनीं काढलेल्या चित्रांची एक स्पर्धा जाहीर करण्यांत आली होती. ह्या स्पर्धेत 'झिप्पी' ह्या चिंपाझीनें बक्षीस मिळविलें असताहि चित्रपट संस्थेनें 'झिप्पीला' चित्रपटांत आश्वासन दिलेलें काम दिलें नाहीं असा दावा त्याच्या मालकानें केला आहे. मालकाच्या म्हणण्याप्रमाणें दर आठवड्याला ७५० डॉलर्स असा मेहनताना देण्याचें ठरविण्यांत आलें होतें. मेहनताना बुडवल्याबद्दल लावलेला हा नुकसानभरपाईचा दावा आहे.


अल्पावधींत आम जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली
आणि
उत्तरोत्तर प्रगतिपथावर असलेली

**जनता सहकारी बँक लि.**
**सांगली.**

( कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली )
फोन नं. २४४ | रजि. नं. १४०९८ | पोस्ट बॅग नं. ९८
शाखा— मार्केट यार्ड — ( फोन ४८४ )

प्रगतिपथावरील बोलके आकडे ( ३०-६-१९६४ अखेर )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेले शेअर भांडवल | रु. | २,१५,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ३४,६८५ |
| एकूण ठेवी | रु. | १४,८५,८५० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ४०,९७,९६८ |
| एकूण उलाढाल ( Turn-Over ) [ १-७-१९६३ ते ३०-६-१९६४ ] | रु. | ७,७७,६०,३५० |

संपूर्ण सेवा ] खास वैशिष्ट्यें [ संपूर्ण सुरक्षितता

ज ] आकर्षक व्याजाचे दराचे सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
न ] बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
ता ] बँक सुरुवातीपासूनच २ टक्के डिव्हिडंड देत आली असून 'अ' वर्गात आहे.

एम्. एस्. कराळे चेअरमन
एस्. एल्. पांड्याजी मॅनेजर
आमदार वसंतरावजी पाटील व्हा. चेअरमन

**कोळशाच्या खाणींचें यांत्रिकीकरण**—राष्ट्रीय कोळसा-विकास मंडळाचे संचालक श्री. राजा मुंबई येथें बोलतांना म्हणाले कीं, भारतामधील कोळशाच्या खाणींचें यांत्रिकीकरण केलें तर उत्पादनाची वाढ वेगानें होऊं शकेल. भारतामधील खाणींत दर माणसाचें पाळीगणिक उत्पादन ०·४२ टन इतकेंच आहे. युरोपांत ते १·४ ते २ टनापर्यंत आहे आणि अमेरिकेंत तर ५ ते १२ टनांपर्यंत आहे.

**फ्रान्सकडून रणगाडे घेणार**—फ्रान्स भारताला रणगाड्यांचा कारखाना उभारण्याच्या कामीं मदत करण्यास तयार आहे. त्याचप्रमाणें कांहीं तयार रणगाडे विकण्याची तयारीहि फ्रान्सनें दाखविली आहे. तथापि ह्या मालाच्या किंमतीबाबत उभयता देशांत अद्याप समजूत पडलेली नाहीं. प्रत्येक रणगाड्यासाठीं १५ हजार पौंड किंमत मागण्यांत येत आहे. पण, एकदम ३० रणगाडे घेतल्यास कांहीं सवलत मिळण्याचाहि संभव आहे.

**जंगल अधिकाऱ्यांची श्रेणी**—पुढील वर्षाच्या प्रारंभापासून भारतामधील जंगलांत काम करणाऱ्यांची एक सेवकश्रेणी चालू करण्याचे मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. ह्या श्रेणींत काम करण्याचें शिक्षण देण्यासाठी जंगल-संशोधन-संस्थेचें जंगल विद्यापिठांत रूपांतर करण्यांत येणार आहे. ह्या श्रेणींत काम करणारांची निवड एका खास बोर्डातर्फे करण्यांत यावयाची आहे.

**खताच्या कारखान्यासाठी परवाना**—मुंबई येथील एका खाजगी कारखानदाराला खताचा कारखाना काढण्याचा परवाना देण्यांत यावा अशी शिफारस म्हैसूर सरकारनें मध्यवर्ती सरकारला केली आहे. संकल्पित कारखाना बहुधा मंगलोर येथें स्थापन करण्यांत येईल आणि त्यांत दरसाल ५ लाख टन खत तयार करण्यांत येईल. भारतामधील शेती कसोशीनें करतां यावी म्हणून खताचा अधिक वापर करणें निकडीचें झालेलें आहे.

**चंद्रावर जाण्यासाठी प्रयत्न**—चंद्रावर आरोहण केल्यावर तेथील भौतिक परिस्थितीचें संशोधन करण्यासाठी एक विशिष्ट प्रकारचा ट्रॅक्टर कॅलिफोर्निआंतील एका विमान कंपनीनें बनविला आहे. ह्या वाहनांत ४ माणसें बसण्याची सोय आहे. चंद्रावरील जमिनीवर तो सुलभतेनें प्रवास करूं शकेल. त्याची कक्षा ९०० किलोमीटर लांबीची आहे, आणि त्यामधील माणसें २०० तासपर्यंत जिवंत राहतील अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.

**कोळशाच्या वहातुकीच्या बोटी**—भारताच्या शिपिंग कॉर्पोरेशनसाठी युगोस्लाव्हिआंतील बोटीच्या कारखान्यांत कोळसा वाहून नेणाऱ्या ४ बोटी बांधण्यांत येत आहेत. युगोस्लाव्हिआच्या बोटींच्या कारखान्यांतून कोळशाची वहातूक करणाऱ्या बोटी प्रथमच बांधण्यांत येत आहेत. प्रत्येक बोटीचें वजन १३,३०० टन असेल. त्या बहुधा १९६६ सालीं कॉर्पोरेशनला देण्यांत येतील.


## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ” ३। ” |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ” ५ ” |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

तुमची जिव्हाळ्याची बँक **बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

**संचालक मंडळ**

अध्यक्ष – श्री. वा. पुं. वर्दे

उपाध्यक्ष – श्री. म. स. पारखे

सभासद

श्री. भा. म. गुप्ते — श्री. मा. वी. शहा

श्री. शं. ल. किर्लोस्कर — श्री. ज. के. रेगे

श्री. वि. सी. शिरगावकर — श्री. र. भि. बांठिया

श्री वि. रा. डफळे — श्री. मा. ल. आपटे

श्री. व. श्री. वैद्य

**भांडवल**

वसूल भांडवल व गंगाजळी } १ कोटीचे वर


खेळतें भांडवल : ३७ कोटींचे वर

■ सोयीस्कर बचत योजना ■ विदेश विनिमयाची सोय

■ प्रमुख ठिकाणीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्

• व्यापार व उद्योग यासाठीं कर्जाची सोय

• औद्योगिक विकासासाठीं मध्यम मुदतीच्या कर्जाची खास योजना



**आपल्या ९१ शाखांनिशी तुमच्या सेवेस सिद्ध**


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.